नियमित फौजदारी खटला क्रं. १७५/२००६
रे.सु.ब.दिवा, गु.रं.नं.१२/२००५
निशाणी क्र.२७१

MHTH11-000308-2020

**न्यायनिर्णय**
(दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी घोषित)

**१.** प्रस्तुतची फिर्याद **आरोपी क्र. ४ सादिक शेखवत शेख व आरोपी क्र. ५ मोहम्मद शाहिद मोहम्मद याकुब चौधरी** विरुध्द रेल्वे संपत्ती बेकायदेशीरपणे बाळगणे, कलम ३(अ) प्रमाणे दाखल केलेली आहे. आरोपी क्र. ५ दिनांक १४/०४/२०२६ रोजी अजामीनपात्र वॉरंन्टमध्ये अटक करण्यात येउन त्याला दिनांक १५/०४/२०२६ रोजी व्ही.सी.द्वारे न्यायालयापुढे हजर केले असता त्याने गुन्हा कबुल केला व निशाणी क्रं.२६६ वर गुन्हा कबूलीचा अर्ज दिला. तसेच आज दि. १५/०४/२०२६ रोजी आरोपी क्र. ४ न्यायालयात हजर झाला व त्याने गुन्हा कबुल करुन निशाणी क्र. २६७ वर गुन्हा कबुलीचा अर्ज दिला. आरोपी क्र. ४ व ५ ने स्वखुशीने गुन्हा कबुल केल्याबाबत मी खात्री केली व निशाणी क्र.२६८ वर त्याच्यावर दोषारोप ठेउन निशाणी क्र. २६९ व २७० वर त्याचे निवेदन नोंदविले तसेच त्याचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले.

**२.** प्रस्तुत प्रकरणात दिनांक २५/०९/२०२५ रोजी रात्री तळोजा स्टेशनजवळ, कि.मी. न. ५६/१६—१७ च्या मध्ये असलेल्या सब स्टेशन जवळ रेल्वे ओ.एच.इ. विभागाचे ४१ नग लोखंडी खांबाचे तुकडे, एकून कि.रू. १,००,०००/— (अक्षरी एक लक्ष रूपये मात्र) किंमतीची मालमत्ता आरोपी क्र. ४ व ५ ने बेकायदेशीरपणे बाळगल्याचे दिसुन आल्यामुळे आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमातील तरतुदींचा लाभ देणे योग्य होणार नाही. आरोपी क्र. ४ व ५ ने प्रस्तुतचा गुन्हा कबुल केला असून त्याच्यावर कुटुंबीयांची जबाबदारी असल्याचे सांगून कमीतकमी शिक्षा देण्याची विनंती केलेली आहे. आरोपी तसेच सदर गुन्हयासाठी

होणा—या शिक्षेबाबत आरोपीला सांगण्यात आले, त्यानंतरही त्याने सदरचा गुन्हा कबुल असल्याबाबत सांगितले. प्रस्तुत गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल हा केवळ कि.रू. १,००,०००/— (अक्षरी एक लक्ष रूपये मात्र) असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदरचे प्रकरण हे २० वर्ष जुने आहे. या सर्व कारणांचा विचार करता पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १) | **आरोपी क्र. ४ सादिक शेखवत शेख व आरोपी क्र. ५ मोहम्मद शाहिद मोहम्मद याकुब चौधरी** हयांना रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम ३(अ) च्या गुन्हासाठी भारतीय फौजदारी प्रक्रिया २४१ अन्वये दोषी ठरविण्यात येते. |
| २) | **आरोपी क्र. ४ सादिक शेखवत शेख व आरोपी क्र. ५ मोहम्मद शाहिद मोहम्मद याकुब चौधरी** हयांना रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम ३(अ) साठी प्रत्येकी रू.१५,०००/— (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) दंड व दंड न भरल्यास १ महिना साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते. |
| ३) | आरोपी क्र. ४ व आरोपी क्र. ५ ने दंडाची रक्कम भरल्यास ती रक्कम रेल्वे प्रशासनाला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी. |
| ४) | आरोपी क्र. ४ व ५ ला निकालपत्राची छायांकित प्रत विनामुल्य व त्वरीत देण्यात यावी. |
| ५) | प्रस्तुत प्रकरणात प्रकरण इतर आरोपीविरूध्द प्रलंबीत असल्याने मुदृदेमालाबाबात आदशे नाहित |
| ६) | सदरचे प्रकरण आरोपी क्र. १, २, ७, ९, १२ व १६ विरूध्द प्रलंबित राहिल. |

VISHWAS PANDURANG SHINDE

Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.04.13 18:06:07 +0530

(व्ही.पी.शिंदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लोहमार्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण

कल्याण
दिनांक : १५/०४/२०२६